विद्यापीठाच्या वाटचालीत विवेक अहिरे यांचे योगदान : डॉ. वडनेरे



ज्ञानगंगोत्री : विद्यापीठाच्या दृक्-श्राव्य केंद्रातील सहकारी विवेक अहिरे यांनी विद्यापीठात काम करताना आपले मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या सकारात्मक प्रयत्नांमुळे सलून टेक्निक्स आणि चर्मकार बांधवांसाठीचा शिक्षणक्रम सुरू झाला असल्याचे गौरवोद्गार निरंतर शिक्षण विद्याशाखेचे संचालक डॉ. राजेंद्र वडनेरे यांनी काढले. श्री. अहिरे यांचा सेवापूर्ती समारंभ डॉ. राजेंद्र वडनेरे यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच पार पडला त्या वेळी ते बोलत होते.

या वेळी विवेक अहिरे यांना विद्यापीठाच्या वतीने सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. जगदिश कुलकर्णी, सुनील साळुंके, कैलास मोहिते, डॉ. संजीवनी महाले, वित्त अधिकारी एम. बी. पाटील आणि डॉ. राजेंद्र वडनेरे यांनी जुन्या आठवणींना उजाळा देऊन अहिरे यांना पुढील आनंददायी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास विविध विद्याशाखांचे संचालक, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रशांत कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर आणि कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे यांनीही त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

वाढदिवसाच्या शुभेच्छा ...!

• श्री. सुनील सीताराम बर्वे	१ मार्च
• श्री. अविनाश उमाकांत भरणे	१ मार्च
• श्रीमती ललिता रघुनाथ टोपे	१ मार्च
• श्री. देविदास गंगाधर लायरे	४ मार्च
• श्री. जोगेश विठ्ठलराव खंडारे	४ मार्च
• श्री. चिंतामण दशरथ धुमणे	४ मार्च
• श्री. रमेश बन्सी वाघ	५ मार्च
• श्री. बाळू कारभारी साबळे	५ मार्च
• श्री. सचिन रामदास सूर्यवंशी	७ मार्च
• श्रीमती रागिणी मंगेश पाटील	८ मार्च
• सौ. कल्पना वसंत राऊत	८ मार्च
• श्री. अनुरथ रामा वाघमारे	१० मार्च
• श्री. लक्ष्मण रामचंद्र शेंडे	१० मार्च
• श्री. संदीप रघुनाथ मगर	११ मार्च
• डॉ. विजया विनायक पाटील	१२ मार्च
• श्री. राजेश सीताराम बर्वे	१५ मार्च
• सौ. ज्योती प्रवीण कामाले	१७ मार्च
• श्री. गोरख सीताराम पवार	१८ मार्च
• श्री. आनंद रामचंद्र यादव	१८ मार्च
• सौ. तारा भुसारे	१९ मार्च
• डॉ. ऋचा राजेश गुजर	२५ मार्च
• श्री. नंदू विठ्ठल थेटे	२५ मार्च
• श्री. संजयकुमार वसंतराव अवचट	२७ मार्च
• श्री. शांताराम पिलाजी सुजगुरे	२७ मार्च
• श्री. सतीश मधुकर पाटील	२९ मार्च
• श्री. सचिन दगू कटारे	३१ मार्च

कुलगुरू, कुलसचिव यांचे अभिनंदन

ज्ञानगंगोत्री : विद्यापीठात विविध पदांवर कार्यरत असलेल्या सर्व सेवांतर्गत (१२ वर्षे पूर्ण करणाऱ्या) कर्मचाऱ्यांना अलीकडेच पदोन्नती देण्यात आली आहे. विद्यापीठ प्रशासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे विद्यापीठ कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. याबद्दल सर्व कर्मचाऱ्यांनी कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन आणि कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे यांच्यासह प्रशासनातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. याकामी सर्वश्री परेश शिऊरकर, सुनील निकम, अनंत बर्वे, मधुकर खांडेकर, संदीप मगर आणि नंदकुमार खैरनार यांनी विशेष पाठपुरावा केला होता.



ज्ञानगंगोत्री : विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त 'शहरी कुटुंबाच्या समस्या' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना सामाजिक कार्यकर्त्या रजिया सुलताना. समवेत कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे, निरंतर शिक्षण विद्याशाखेचे संचालक डॉ. राजेंद्र वडनेरे, वित्त अधिकारी मगन पाटील आणि सावित्रीबाई फुले अध्यासनाचे प्रमुख प्रा. प्रविण घोडेस्वार.

कार्यकारी संपादक : संतोष साबळे, **निर्मिती :** आनंद यादव, **सदस्य :** विवेक ओक, **छायाचित्रे :** राजेश बर्वे **मुद्रक व प्रकाशक :** डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२, **मुद्रक :** नरेंद्र शाळिग्राम, मे. रिप्लिका प्रिंटर्स, वकीलवाडी, नाशिक. **अक्षरजुळणी व मांडणी :** बाबा जाधव (खासगी वितरणासाठी)

'ज्ञानगंगा घरोघरी' पोहोचविण्यासाठी मुक्त शिक्षणपद्धती प्रभावी माध्यम : डॉ. वेदप्रकाश मिश्रा

विद्यापीठाचा २३ वा दीक्षान्त समारंभ उत्साहात संपन्न; १ लाख ४० हजार ४८४ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान



ज्ञानगंगोत्री : देशातील प्रत्येक घराघरापर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचविण्यासाठी मुक्त शिक्षणपद्धती प्रभावी माध्यम आहे. सर्वच मुक्त विद्यापीठे शैक्षणिक क्षेत्रातील तीर्थक्षेत्र असून समाजातील जास्तीतजास्त घटकांनी मुक्त शिक्षणाच्या प्रवाहात यायला हवे, असे प्रतिपादन कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सचे कुलपती व दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सचे प्र. कुलपती डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी केले.

विद्यापीठाच्या २३ व्या दीक्षान्त समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सचे कुलपती व दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सचे प्र. कुलपती डॉ. वेदप्रकाश मिश्रा, कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे, परीक्षा नियंत्रक डॉ. अर्जुन घाटुळे, व्यवस्थापन मंडळ सदस्य, विद्वत परिषदेचे सदस्य व नियोजन मंडळाचे सदस्य उपस्थित होते. कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यशवंतराव चव्हाण यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्प अर्पण करून प्रमुख अतिथींनी अभिवादन केले. यानंतर विद्वत परिषदेची दिंडी सभा मंडपात आली.

कुलगुरू प्रा. डॉ. दिलीप म्हैसेकर यांनी या वेळी विद्यापीठाचा अहवाल सादर केला. ते म्हणाले, गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांनी डी.लिट. पदवी स्वीकारण्यास सहमती दर्शविल्याने विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला असल्याचे डॉ. म्हैसेकर यांनी सांगितले.

या वेळी डॉ. वेदप्रकाश मिश्रा, कुलगुरू प्रा. डॉ. दिलीप म्हैसेकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सुवर्णपदके आणि पारितोषिके देण्यात आली. याप्रसंगी लतादीदींच्या कारकिर्दीवर प्रकाश टाकणारी ध्वनिचित्रफिती यावेळी दाखविण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल चिकेरूर यांनी केले. कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

विद्यापीठाच्या कुलगुरूपदी प्रा. ई वायुनंदन

पदभार स्वीकारला; सर्वांना बरोबर घेऊन प्रगती साधणार



ज्ञानगंगोत्री : मुक्त शिक्षण हे एक सांघिक काम आहे. ही जबाबदारी पार पाडताना सर्वांना बरोबर घेऊन काम करण्यावर भर दिला जाईल. सध्या दूरशिक्षणापुढे अनेक मोठी आव्हाने आहेत. या आव्हानांना तोंड देण्यासाठी हे विद्यापीठ कटिबद्ध राहील, यादृष्टीने काम करण्यावर भर दिला जाईल, असा विश्वास मुक्त विद्यापीठाचे नवनिर्वाचित कुलगुरू प्रा. ई वायुनंदन यांनी केले.

मुक्त विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रा. दिलीप म्हैसेकर यांच्याकडून ८ मार्च रोजी प्रा. ई वायुनंदन यांनी कुलगुरुपदाची सूत्रे स्वीकारली. कुलगुरुपदाची जबाबदारी स्वीकारणारे ते १६ वे कुलगुरू आहेत. प्रा. डॉ. दिलीप म्हैसेकर यांनी सही करून विद्यापीठाची सूत्रे प्रा. वायुनंदन यांच्याकडे बहाल केली त्यानंतर ते बोलत होते. तत्पूर्वी त्यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमास विद्यापीठातील सर्व विद्याशाखांचे संचालक, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

शेगाव सायकल वारीतून प्रदूषण मुक्तीचा संदेश



नाशिक सायकलिस्ट फाऊंडेशनतर्फे ८ ते १० जुलै २०१६ या कालावधीत पंढरपूरची सायकलवारी यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर आम्ही ठरवले की विदर्भाचे पंढरपूर असलेल्या शेगावी सायकल दौरा करावा. यात यशवंत दुसाने, वाल्मीक सांगळे, शरद सोनवणे, सुधाकर निंबाळकर, प्रदीप गायकवाड तसेच मोतिराम बागुल यांनी सहभाग घेतला.

भटकंती

यशवंत दुसाने/शरद सोनवणे
परीक्षा विभाग, मुक्त विद्यापीठ

पर्यावरणाशी जवळीक साधावी, प्रदूषणमुक्तीचा संदेश सायकलद्वारे जनतेला द्यावा तसेच सायकल चालविण्यासाठी तरुणांना प्रोत्साहित करावे, या उद्देशाने दि. १९ जानेवारी २०१७ रोजी सायकलवारी चालू केली. सकाळी सहाच्या दरम्यान सरु वात करून पहिला मुक्काम औरंगाबाद येथे केला. रस्त्यात बऱ्याच तरुणांनी सायकल किती गीअरची आहे, किती किंमत आहे, गीअर आहे मग पॅडल मारावे लागतात की नाही, एवढी किंमत तर मग मोटारसायकलच का नाही घेत, असे अनेक विचित्र प्रश्नही केले. एकंदरीत वेगळाच अनुभव आला. खंडाळा, वैजापूर येथे जानकार लोकांनी चहापाण्यासाठी आग्रह केला, सायकलवर वारी करता आहात याचा त्यांना फारच अभिमान वाटला.

औरंगाबाद सोडल्यावर भोकरदनमार्गे बुलढाणा येथे गेलो. भोकरदनच्या रस्त्याची दुरवस्था बघवत नव्हती. बाकी रस्ता ठीक होता. पुढे मुक्कामासाठी बुलढाणा येथे थांबलो. तेथील जेवण व सकाळचा नाष्टा फारच उत्तम होता. बुलढाणा एकंदरीत छानच वाटले.

तिसऱ्या दिवशी बोथा फॉरेस्टमार्गे खामगाव व तेथून पुढे शेगावी सकाळी साडेअकराच्या दरम्यान पोहोचलो. बोथा फॉरेस्टमार्गे खामगाव हा रस्ता फारच सुंदर होता. चढ आणि उतार यामुळे सायकलिंग करायला फारच उत्साह होता. जंगलरस्ता कधी संपला ते कळालेच नाही. रस्त्यात आम्हाला निलगायींचा कळप, वानरांचा कळप व काही रानमांजरीही बघायला मिळाल्या. सोबतीला आमची बॅकअप व्हॅन होती. चालक आणि त्याचा सहकारी यांनाही वेगळाच अनुभव आला. ही वेगळीच वारी त्यांना अनुभवता आली. एकंदरीत शेगावची सायकलवारी सफल झाली. शेगावच्या गजानन माउलींच्या आशीर्वादाच्या जोरावर परत २२ जानेवारी २०१७ रोजी घरी सुखरूप पोहोचलो.

जिज्ञासा गुजर हिचे यश



नाशिक : निरंतर शिक्षण विद्याशाखेतील प्रा. डॉ. ऋचा गुजर यांच्या कन्या कु. जिज्ञासा गुजर यांनी नुकतेच डिसेंबर २०१६ मध्ये 'Masters by Research in Cancer Sciences' हा संशोधन शिक्षणक्रम University of Birmingham United Kingdom येथून मेरीटमध्ये पूर्ण केला.

कु. जिज्ञासा यांची University of Heidelberg Germany येथे Ph.D. in Genetic Engineering in faculty of Neuroscinces मध्ये निवड झालेली आहे. त्याकरिता त्या एप्रिल २०१७ मध्ये प्रस्थान करणार आहेत. कु. जिज्ञासा जागतिक स्तरावर संशोधनाची गरज असलेल्या Modelling the deficiency in NB-S by using gene editing tools in Zebrafish as a model organism या विषयावर संशोधन करणार आहेत. त्यांच्या निवडीबद्दल आणि यशाबद्दल हार्दिक अभिनंदन.

विद्यापीठात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



ज्ञानगंगोत्री : विद्यापीठाच्या मुख्य इमारतीत नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी वित्त अधिकारी मगन पाटील, उपकुलसचिव सुवर्णा चव्हाण, सेवा सुविधा विभागाचे प्रमुख सुनील बर्वे यांच्यासह विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांचे संचालक, शिक्षक, अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बोलु कवतिके मैफिलीस नाशिककरांची दाद

निमित्त मराठी भाषा गौरव दिनाचे



नाशिक : मधुर गीतांची उधळण, भक्तिगीते, भावगीते, लोकगीते, कविता, ओव्या, भारूड, नाट्यगीत, संतरचना, गवळण, चित्रपट संगीत, अभंग, लावणी आणि अभिवाचन अशा रंगारंग सांस्कृतिक जल्लोषात नाशिककर चिंब झाले. टाळ्यांचा कडकडाट, शिट्यांची उत्स्फूर्त दाद अशा अभूतपूर्व वातावरणात 'बोलु कवतिके' सांस्कृतिक कार्यक्रमाचा नाशिककरांनी मनमुराद आनंद लुटला.

मुक्त विद्यापीठ आणि राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग





यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिवसाचे औचित्य साधून नाशिककरांसाठी आयोजित करण्यात आलेल्या सुरभी, पुणे निर्मित 'बोलु कवतिके' या मराठीचे गुणगान गाणाऱ्या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. येथील कालिदास कलामंदिरात रविवारची संध्याकाळ सप्तस्वरांच्या आणि अभिवाचनात अक्षरशः हरपून गेली. 'जय शारदे वागेश्वरी' या सरस्वती स्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मोगरा फुलला, या जन्मावर... या जगण्यावर, घनश्याम सुंदरा, राम जन्मला गं सखे, कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे, झिनी झिनी वाजे बीन, सर्वात्मता शिवसुंदरा, मळ्याच्या मळ्यामंदी कोण गं उभी, माझी मैना यासह असंख्य भावगीते, भक्तिगीते आणि लोकगीतांनी श्रोते चिंब झाले. ज्येष्ठ गायक रवींद्र साठे, अनुराधा मराठे, योगिता गोडबोले, श्रीरंग भावे, अशोक काळे यांनी गायलेल्या सदाबहार गीतांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. मराठी मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गीतरामायणातील निवडक वेच्यांच्या सादरीकरणाने ही संगीत मैफल मोठ्या उंचीवर गेली. प्राजक्ता राज (अत्रे) यांनी नृत्ये सादर केली. तुषार दळवी, मधुरा वेलणकर, प्रवीण जोशी यांनी खास शैलीत केलेल्या अभिवाचनामुळे कार्यक्रमात रंगत आली.

वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, आचार्य अत्रे, व्यंकटेश माडगुळकर, गदिमा, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, शांता शेळके, बा. सी. मर्ढेकर यांपासून सुरेश भट, आरती प्रभू, ग्रेस यांच्या साहित्यावर आधारित दृक-श्राव्य कलाविष्कार नाशिककरांना यानिमित्ताने अनुभवायला मिळाला. केदार परांजपे यांनी संगीत संयोजन केलेल्या या विशेष कार्यक्रमासाठी प्रवीण जोशी यांनी संहितालेखन केले होते.

मराठी भाषा दिनाचे औचित्य साधत विद्यापीठाच्या दृक-श्राव्य केंद्राने तयार केलेला माहितीपटही यावेळी दाखविण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण तथा सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे यांनी ध्वनिचित्रफितीद्वारे राजभाषा दिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती दिली. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमास नाशिककरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

मुक्त विद्यापीठात शिवजयंती साजरी



ज्ञानगंगोत्री : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी परीक्षा नियंत्रक डॉ. अर्जुन घाटुळे यांनी शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीत झालेल्या या कार्यक्रमास विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.